अंक ५ वा

दिनांक :-
१ फेब्रुवारी २०२१

# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल

गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# नागरिकांना आवाहन,

## व्हॅलेंटाईन डे निमित्त तुम्हालाही मिळत आहेत फ्री गिफ्ट कार्ड च्या लिंक्स, तर मग सावधान !

सायबर सेल गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड यांच्याद्वारे आजच्या अंकाच्या माध्यमातून प्रेमवीरांना सावध करण्यात येत आहे, कित्येक तरुणांना व्हॅलेंटाईन डे निमित्त आपल्या आवडत्या व्यक्तीला सर्वात सुंदर अविस्मरणीय सरप्राईज देण्यची घाई सुरू आहे आणि यासाठी बरेच जण वेगवेगळे प्रयत्न आणि पर्यायही आजमावत आहे पण या घाई गडबडीत असताना व्हाट्सअप वर फ्री कुपन किंवा गिफ्ट कार्ड देत असणाऱ्या फॉरवर्डेड लिंक्स चा सुळसुळाट सुरू झाला आहे.




बऱ्याच जणांना व्हॅलेंटाईन डे निमित्त अशा प्रकारच्या लिंक्स व्हाट्सअप वर प्राप्त झालेल्या असतील, ज्यामध्ये एखाद्या प्रसिद्ध हॉटेलमध्ये सात दिवसांचे बुकिंग किंवा काहीतरी भेटवस्तू मिळेल सांगितले जाते आणि त्या लिंक्स कुठलाही विचार न करता सर्रासपणे एकमेकांना फॉरवर्ड केल्या जात आहेत पण महत्वाचा मुद्दा म्हणजे फॉरवर्ड केल्या जाणाऱ्या या लिंक्स फेक आहेत आणि अश्याच काही लिंक्स मध्ये नामवंत हॉटेल ताज चे नाव सुद्धा शामिल आहे.

# फेक लिंक्स वर हॉटेल ताज कडून मिळालेले स्पष्टीकरण-

हॉटेल ताजने असे ट्विट केले आहे की, आमच्या असे निदर्शनास आले आहे की, व्हाट्सअप वरून व्हॅलेंटाईन डे निमित्त ताज अनुभव भेट कार्ड ची ऑफर देण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. आम्ही सांगू इच्छितो की, हॉटेल ताज अशा प्रकारची कुठलीही ऑफर देत नाही आहे. कृपया यासाठी खबरदारी घेण्याची आणि जाणीवपूर्वक लक्ष देण्याची विनंती करतो.

> **Taj Hotels**
> @TajHotels
>
> It has come to our notice that a website has been promoting a Valentine's Day initiative, offering a Taj Experiences Gift Card via WhatsApp. We would like to inform that Taj Hotels/IHCL has not offered any such promotion. We request to take note of this and exercise due caution.
>
> 6:52 PM · Jan 30, 2021 · Twitter Web App

सायबर सेल गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड द्वारे सर्व नागरिकांना असे आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या ऑफर्स असलेल्या लिंक्स ना प्रतिसाद देऊ नये, ते इतरांना फॉरवर्ड करू नये किंवा त्यावर क्लिक करून त्यावर आपली वैयक्तिक माहिती देऊ नये.

**- संबंधित अंक इतरांसोबत शेअर करून अशा प्रकारची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी आपला सहभाग द्यावा.**

# सावध व्हा, सुरक्षित रहा

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

**Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in**

**Contact No.- 020- 27350939**